Historicity Research Journal
Volume 2 | Issue 8 | April 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# पेशवेकालीन अहमदनगरमधील न्यायदान पध्दती

**संतोष यादव**
**संशोधक विद्यार्थी [विद्यावाचस्पती] टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.**

***प्रस्तावनाः***

पेशवेकालीन अहमदनगरच्या न्यायदान पध्दतीत मुसलमानी छाप पडलेला दिसतो. या न्याय संस्थेमध्ये हिंदू आणि मुसलमान परंपरांचे मिश्रण झालेले आढळते.

या कायदयाचे उगमस्थान हिंदू धर्मशास्त्र, मनुस्मृति मिताक्षरा, व्यवहारप्रमूख, दानकमलाकर, पराशरमाधवीयम, चतुवर्ग चिंतामणि ही मध्यमयुगीन महाराष्ट्रातील विधिनियमांची उत्पत्तिस्थाने होती. शिवाय जातीय तंटे सोडविण्यासाठी जातीय तंटयाशी संबंधित यातिनिर्णय स्मृतिग्रंथाचा उपयोग होई. परंपरागत चालीरिती हे सुध्दा विधिनियमांचे एक उदगमस्थान मानण्यात येई.

## १. पेशवेकालीन नगरमध्ये आढळणारे कायदे :-

- विवाह कायदा
- वारसा कायदा
- मालमत्ता कायदा
- दत्तक कायदा

## १.२ न्यायरचना :-

पेशव्याकडे सर्वोच्च न्यायालयीन अधिकार होते. तथापि न्यायाधीश हाच राज्याचा प्रमूख न्यायदंडाधिकारी होता. त्याच्याकडे दिवाणी आणि फौजदारी या दोन्ही प्रकारच्या खटल्यांचा न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असे. ज्यांना मुतालिकी शिक्का मिळालेला होता अशा सुभेदारांना प्राथमिक सुनावणीचा अधिकार होता. तो नगरच्या पेशवाई काळात शिंदे, निंबाळकर, भोसल्यांना मिळाल्याचे दिसते. सुभेदार जरी वेगवेगळया सुभ्यावर असली तरी मुख्य न्यायप्रसंगी ते नगरच्या किल्ल्यात उपस्थित राहत. किरकोळ खटल्यांचा न्यायनिवाडा मुत्सद्दी अधिकारी करीत. परगणे कार्यात आणि खेडयात गरजेप्रमाणे न्यायालये बोलाविण्यात येत. परंतू महत्वाचे अभियोग सामान्यतः मुख्य ठिकाणीच होत. पेशवे कालीन अहमदनगरचा मुख्य न्यायाधीश म्हणून नाना फडणवीसांचा उल्लेख अनेक पत्रांमधून समोर येतो.

## १.३ न्यायदानाची प्रक्रिया :-

न्यायालयाला "मजलिस" म्हणत. वादीने खटला भरल्यानंतर त्याच्या अभियोगाच्या तपासणीसाठी मजलिसला बोलाविण्यात येई. मजलिसच्या अध्यक्षाला सभानायक म्हणत. परगण्याच्या मजलिसमध्ये देशमुख हा अध्यक्ष असे. जामखेड तालुक्यातील डोणगाव येथील यादव [देशमुख] यांच्याकडील मोडी पत्र व्यवहारात न्यायदानाचा उल्लेख आढळतो. तर खेडयातील मजलिसमध्ये मोकादम, कसब्याच्या मजलिसमध्ये शेटे आणि ब्रम्हसभेमध्ये धर्माधिकारी हे अध्यक्ष असत.

एखादया अभियोगाचा न्यायनिवाडा न्यायालय एकत्र आल्यानंतर अग्रवादी पहिल्याने आपली बाजू मांडून त्याबद्दलचे एक लेखी निवेदन देई. हयाला तकरीर म्हणत. मग पश्चिम वादीला बोलाविण्यात येई. तो पण आपली स्वतःची बाजू मांडून एक तकरीर न्यायालयाला सादर करी. दोघांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दोन्ही पक्षकारांना एकमेकांच्या निवेदनाला उत्तर देण्यास सांगण्यात येत असे. अग्रवादीचे उत्तर आणि पश्चिमवादीचे उत्तर दोन्हींना पुरसीस म्हणत. त्यानंतर न्यायालयाचे सर्व सभासद दोन्ही पक्षांनी हजर केलेल्या पुराव्याचे निरीक्षण करुन त्यांच्या अभियोगाबद्दल निर्णय घेत. हा निर्णय एका महजर च्या स्वरुपात देण्यात येऊन त्यावर मजलिसच्या सभासदांची नावे व हुद्दे लिहिण्यात येत.

मजलिसने दिलेल्या निर्णयाने किंवा तेथील कामकाजाने पक्षकारांचे समाधान झाले नाही तर वरच्या न्यायालयात दाद मागण्याचा त्यांना हक्क होता. ज्या गावातून पहिल्याने खटला भरला जाई आणि इतर ज्या गावात मजलिस असत त्यांना नुसते थल म्हणत. थलाच्या मजलिसने दिलेल्या निर्णयाला थलपत्र म्हणत. हे थलपत्र मायथलच्या मजलिसला सादर केल्यानंतर ते महजरच्या स्वरुपात तोच निर्णय देत असे. इ स १७५० नंतर मजलिसने न्यायनिवाडा करण्याच्या पध्दतीऐवजी पंचायती न्यायनिवाडा पध्दत हळूहळू रुढ होऊ लागली. किरकोळ फेरफार वगळता पंचायतीतील न्यायदानाची प्रक्रिया मजलिसमधील न्यायदानाच्या प्रक्रियेसारखीच होती. मुख्य म्हणजे न्यायालयीन पारिभाषीक शब्दात बदल घडून आला. पंचायतीने दिलेल्या निर्णयाला सारांश व शेवटी विजयी पक्षाला देण्यात येणाऱ्या निर्णयपत्राला निवाडपत्र म्हणण्यात येऊ लागले. असे निवाडपत्रे नगरमधील कडेकर, देशमुख, मिरीकर, पळशीचे पळशीकर घराण्याकडे आजही चांगल्या स्थितीत आहेत. मुख्य न्यायाधीशाच्या मदतीस अमीन आणि काही दप्तरदार किंवा कारकून असत

अहमदनगरमधील न्यायपध्दत ही फार गुंतागुंतीची व दिर्घसूत्री दिसते. कारण याठिकाणी मुस्लिम समूदाय मोठया प्रमाणात होता. त्यामुळे इस्लामच्या कायदयानुसार बरीच रचना अहमदनगरमध्ये आढळते. इनाम जमिनीचा वारसा, सीमाप्रश्न, देशपांडे व देशमुखी वतन यासंबंधीचा न्यायनिवाडा वेळेवर होत नसे. प्रकरणांचा निकाल क्वचितच दोन वर्षात लागत असे. नाहीतर पक्षकारांना आपले अभियोग एका न्यायालयातून दुसऱ्या न्यायालयात नेता नेता बराच काळ थांबावे लागे. नाना फडणीसाच्या काळात या प्रकरणांचा निकाल साधारणपणे पाच वर्षात लागल्याचा उल्लेख आढळतो.

**पेशवेकालीन अहमदनगर न्यायव्यवस्थेची ठळक वैशिष्टये:-**

मराठेकालीन न्यायव्यवस्थेवर डॉ व्ही टी गुणे यांनी The Judicial System of the Marathas हा संशोधनात्मक ग्रंथ लिहिला आहे. तसेच डॉ.एस.एन. सेन यांनी आपले याच विषयावरचे संशोधन Administrative of the Maratha या ग्रंथाद्वारे मांडले आहे. इ.स. १७०७-१८१८ हा पेशवाईचा कालखंड होय. या कालखंडात छत्रपती व पेशवा ही दोन सत्ताकेंद्रे होती. इ.स. १७०७ ते १७५० पर्यंत सातारचा राजा हा मराठी राज्याचा सार्वभौम सत्ताधीश होता. इ.स.१७५० नंतर मात्र राजा दुबळा होऊन राजाचे महत्व कमी झाले व पेशव्यांचे वाढले. न्यायसंस्थेचे काम करणारी धर्मसभा नामशेष झाली व लष्करी, मुलकी, दिवाणी अधिकार पेशव्याच्या हाती एकवटले होते. पहिल्या तीन पेशव्यांनी त्याऐवजी पंचायत पध्दती आणली.

**१.१ पेशवेकालीन अहमदनगरचे न्यायव्यवस्थेचे घटक :-**

**१.२.१ पंचायती पध्दती** : स्थानिक न्याय प्रशासन चालविण्यासाठी पेशव्यांनी सरसुभेदार, मामलेदार व कामावीसदार हे अधिकारी नेमले होते. या अधिकाऱ्यांच्या श्रेयाबद्दल फारशी माहिती मिळत नाही. हे अधिकारी जागच्या जागीच वादी प्रतिवादीचे म्हणणे ऐकून खटल्याचा निकाल देत असत. खटल्याचा निकाल अमान्य असेल तर वरिष्ठांकडे तक्रार करता येत असे. पेशव्यांच्या जुन्या सरदारांच्या नेतृत्वाखाली फडणवीस, पांडे पटेल या अधिकाऱ्यांच्या मदतीनेही न्यायदानाचे काम चाले. पण त्यासाठीही पंचायतीचा सल्ला घेतला जात असे. अत्यंत महत्वाचा खटला असेल तर तो निर्णयासाठी पेशव्यांकडे पाठविला जात असे. पंचायत न्यायदान करणारी महत्वाची संस्था होती. गावातील प्रतिष्ठीत वयोवृध्द त्यात असत. पंचायतमधील सदस्यांची संख्या निश्चित नसे. पेशवाईत पंचायत पध्दतीचे महत्व खूप वाढले होते. छत्रपती शाहूंच्या व पेशव्यांच्या काळात न्यायसंस्थेचे सरंजामशाहीकरण झाले होते असे म्हणावे लागेल. कारण मराठा मंडळातील सरदार हे आपापल्या प्रदेशात न्यायदान करण्याचे काम करीत असत. इ.स.१७५० नंतर मजलीसचे महत्व कमी झाले. पंचायत ही गावच्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर भरे. निवाडापत्र देणाऱ्या अधिकाऱ्याची सही -शिक्का निवाडापत्रावर असे. निवाडा पत्रावर राजाची सही व शिक्काही असे. या निवाडापत्राची स्थानिक अधिकाऱ्यांमार्फत अंमलबजावणी करण्यात येई. १. वारंवार सूचना देऊनही जर एखादा पक्षकार गैरहजर राहिला तर त्याच्या गैरहजेरीत निर्णय दिला जात असे. वरील निर्णय पेशवेकालीन अहमदनगर मध्ये दिवाण पळशीकऱ्यांच्या मोडी संग्रहात अधिक प्रमाणात आढळतात.

**१.२.२ गोतसभा :-**

शाहूच्या काळात गोतसभेला महत्व होते. पण १७५० नंतर गोतसभेचे महत्व कमी झाले. गोतसभेचे काम पंचायत करु लागली. गोतसभेचे ३ प्रकार होते.

१. परगाणा गोतसभा
२. कसबा [पेठ] गोतसभा
३. खेडेगावची गोतसभा

परगण्यातील एक वजनदार न्यायसंस्था म्हणजे परगणा गोतसभा होय. त्यात देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, सरकारी अधिकारी, प्रजा यांचा समावेश असे. देशमुख हे परगणा गोतसभेचे प्रमुख होते. देशपांडे हा देशमुखाला साहाय्य करी. काही वेळा दिवाण हा पगरणा गोतसभेत निकाल देण्याचे काम करी. अशीच यंत्रणा कसबा पेठ गोतसभेसाठी होती. पेठ गोतसभेचा दिवाण न्यायदानाचे काम पाही. या गोतसभेचे सर्व सदस्य निकालपत्रावर आपापल्या खुणा करीत असत.

खेडेगावच्या गोतसभेत सर्व वतनदार, १२ बलुतेदार, अलुतेदार, उपरे असत. गाव गोतसभेचा प्रमुख पाटील होता व त्याच्या मदतीला कुलकर्णी व चौगुले असत. ग्राम गोतसभेतील सर्व सभासद एकत्र बसून न्यायदानाचे काम करीत. गोतसभेचा निर्णय राजाही बदलू शकत नसे. न्यायनिवाडा पत्रावर गावातला दार, बलुतेदार आपापल्या खुणा/चिन्हे उठवीत.

गोतसभेपुढे वतन व वारसा हक्काविषयक तंटे, गावाच्या सीमेसंबंधीचे तंटे, विवाह विषयक वेतनहककासंबंधीचे तंटे येत. धार्मिक स्वरुपाचेही तंटे येत. गोतसभेची बैठक खेडयातील देवळात, वृक्षाखाली, धर्मक्षेत्राचया संगमावर, नदी काठावर भरे. दोन व्यक्तीमध्ये तंटा निर्माण झाला की, त्याची तक्रार केली जात असे. तंटा सामोपचाराने मिटवण्याचा प्रयत्न होई. पण त्यात अपयश आले की, गोतसभेकडे तक्रार करतांना कागदोपत्री व तोंडी पुरावे दयावे लागत. पुरावे व साक्षी तपासल्या जात असत. दत्तक विधानासंबंधी गोतसभेचे अधिकार अंतिम होते.

गोतसभा ही लोकाभिमुख संस्था होती. तिचा ऱ्हास पंचायत पध्दतीमुळे झाला.

**१.२.३ ब्रम्हसभा :-**

ब्रम्हसभा म्हणजे विद्वान ब्राम्हणांची सभा होय. या सभा चांभारगोंदे, नेवासे, पळसी इ. ठिकाणी होत्या. या सभेत फक्त स्थानिक , वैदिक, पंडीत, ज्योतिषी, पुराणिक, मीमांसक असत. त्यांच्या नेमणुका सरकार करी. ब्रम्हसभेचे सभासद धर्मशास्त्राचे उत्तम जाणकार होते. भारतीय कायदा त्यांना माहिती होता. ब्रम्हसभा ही न्यायदानाचे काम करी. तिच्या प्रमुखाला धर्माधिकारी म्हणत. ब्राम्हणसभेचा निर्णय अमान्य केल्यास त्याचे वतन नष्ट होई.

**१.२.४ जातसभा :-**

जातसभेत त्या त्या जातीतील काहीशी पुढारलेली माणसे असत. जातीची बंधने व्यवस्थित पाळली जातात की नाही हे पाहणे, जातसभेचे काम होते. जातीसभेचा निकाल अमान्य असेल तर ब्रम्हसभेकडे प्रकरण पाठविले जाई. पण तेथील निकाल मात्र बंधनकारक होता.

**२. मजलिस :-**

ही प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती शाहूच्या काळात काम करत होती. राजाला न्यायविषयक कार्यात सल्ला देणारी, मदत करणारी अशी ती एक राजाश्रीत संस्था होती. तीच पध्दती थोडया फार फरकाने पेशवे काळात रुढ झाल्याची दिसते. त्यात विद्वान, रुढी परंपरा व धार्मिक नीतिनियम जाणणाऱ्या समाजातील प्रमुख लोकांचा समावेश होता.

**३. पेशवेकालीन दिव्य पध्दत :-**

पंचायत पध्दतीच्या न्यायव्यवस्थेत साक्षी, पुरावा व दिव्य या गोष्टींना महत्व होते. पंचायत पध्दतीत कागदपत्रांचा पुरावा म्हणून उपयोग होई. न्यायनिवाडा करणारे अधिकारी ही कागदपत्रे अस्सल आहेत का हे बारकाईने पाहत असत. ज्या प्रकरणात कागदोपत्री पुरावा नाही तेथे साक्ष महत्वाची मानली जाई. साक्षीदार हे गावातील प्रतिष्ठित, गावच्या परंपरा व इतिहास जाणणारे तसेच वतनदार, बलुतेदार असत. पेशवे काळात साक्षी पुराव्याच्या जोडीलाच दिव्य करण्याची पध्दत वापरली जाई. दिव्याचे पुढील प्रकार होते.

१. विषदिव्य
२. अग्निदिव्य- तप्त लोखंडाचा दिवा हातात घेऊन मंदिराभोवती ७ प्रदक्षिणा घालणे.
३. ऐरणी दिव्य - हे दिव्य गावाच्या तंटयात वापरत.
४. कोष दिव्य
५. खा दिव्य - एखादया भांडयात तेल व तूप याचे मिश्रण करुन उकळणे.

गुन्हेगाराने त्यातील लोखंडयाचा तुकडा हाताने काढणे. गुन्हेगार जर निर्दोष असेल तर त्याच्या हातावर जखम होत नाही. तो निर्दोष आहे असे समजले जाई. वरील दिव्याशिवाय इतरही दिव्य होती.

**३.१ वातीची क्रिया :-** श्रावणतील १५ दिवसांत ज्योतीने ज्योत पाजळली जात असे. ज्याची ज्योत विझेल तो गुन्हेगार ठरविला जाई.

**३.२ सत्य व बेल भंडार :-** हिंदू धर्मात बेल व भंडारा हा पवित्र मानला जाई. गुन्हेगाराने बेल व भंडारा उचलला व त्यास १५ दिवसांत काही दगाफटका बसला नाही तर ती व्यक्ती निर्दोष समजली जाई.

**३.३ शपथ :-** गुन्हयाची सत्य असत्यता शोधण्याची ही एक पध्दत होती. तुळशीचे पान हातात घेऊन शपथ, गाईला हात लावून शपथ, कुराणावर हात ठेवून शपथ, ज्ञानेश्वरी गीता या ग्रंथांवर हात ठेवून शपथ घेणे, काही वेळेस महाराष्ट्र धर्म या शब्दाचीही शपथ दिली जाई.

दिव्य हे सरकारी अधिकाऱ्याच्या उपस्थितीत त्याच्या साक्षीनेच झाले पाहीजे असा दंडक होता.

**४. पेशवेकालीन नगरमधील गुन्हे व शिक्षा यांचे स्वरुप :-**

दोन गावच्या सरहद्दीबद्दल जर तंटा निर्माण झाला तर गावच्या पाटलामार्फत हा तंटा सोडविला जाई. सरहद तंटयातही पंचायतीचा आधार घेत असत. पेशवेकाळात राजदंड देण्याचे काम स्वत: पेशवे व त्यांचे सरदार करत. सरन्यायाधीश हा पेशव्यानंतरचा सर्व दिवाणी व फौजदारी खटले चालविणारा अधिकारी मानला जात असे. स्थानिक न्यायदान पध्दतीत सरसुभेदार, सुभेदार, कमावीसदार व पाटील यांचा समावेश होत असे. स्मृतिग्रंथ व हिंदूंचे कायदेविषयक ग्रंथ हे न्यायदानाचे आधार मानले जात.

एखादया गुन्हेगाराने आपणास गुन्हा केल्याचा पश्चाताप होतो अशी कबुली दिल्यास त्यास माफ करण्याची पध्दत होती. अर्थात हे गुन्हयाच्या स्वरुपावर ठरे. सक्तीच्या इस्लाम धर्म प्रवेशानंतर संबंधित व्यक्तीला हिंदू धर्मात यावयाचे असेल तर त्याला परत हिंदू धर्मात प्रवेश दिला जाई.

मालमत्ता, वारसाहक्क, दत्तकविधन, आर्थिक वयवहारासंबंधीचे वाद हे सर्व दिवाणी स्वरुपाचे गुन्हे होते. सर्वसाधारणपणे समाजाने नीतिनियमांचे पालन करावे ही एकूण अपेक्षा असे. वडिलोपार्जित मालमत्तेत सर्व मुलांना समान वाटा मिळे. पण स्वकष्टार्जित या पध्दतीतून झालेल्या संततीस मालमत्तेचा हक्क मिळत नसे. दत्तक विधानास प्रथम गोतसभेची व सरकारची मंजुरी आवश्यक असे. नंतरच दत्तकविधानांची सनद मिळे. राजद्रोह, खून, चोऱ्या, दरोडे, फसवणुक, बदकर्म, जबरीचे लग्न, भूमिगत द्रव्ये मिळणे, चोरीच्या मालाची खरेदी इ. फौजदारी स्वरुपाचे गुन्हे समजले जात.

फौजदारी गुन्हा सिध्द झाल्यानंतर त्याला फाशीची शिक्षा दिली जात नसे. पण हत्तीच्या पायाखाली देणे, मुंडके छाटणे, तोफेच्या तोंडी देणे या शिक्षा दिल्या जात. गुन्हेगाराचे पाय तोडण्याचीही शिक्षा दिली जाई.

**५. न्यायदानाबाबत एलफिन्स्टन म्हणतो :-**

मराठयांची न्याय प्रशासन पध्दती ही अतिशय अपरिपूर्ण होती. दैनंदिन न्याय प्रशासन असे नव्हतेच. फिर्याद दाखल करुन घेण्याची अशी व्यवस्थाच नव्हती आणि ती दाखल करुन घेतल्यानंतर त्याच्या कार्यवाहीविषयी निश्चित नियम नव्हते. ज्या सरकारी अधिकाऱ्याकडे ती तक्रार दिली असेल ती स्विकारण्याचे अथवा त्याकडे दुर्लक्ष करण्याचे सर्वस्वी त्याच्या मर्जीवर अवलंबुन होते.

पेशवे दरवर्षी राज्यात दौरे काढत व फिर्यादी नोंदवून घेत. बाळाजी बाजीराव, दुसरा बाजीराव यांनी दौरे काढल्याची नोंद आहे.

पेशवे काळात ग्रंथनिविष्ठ कायदा नव्हता. न्यायालयीन कायदा पध्दतीचे निश्चित स्वरुप नव्हते. प्राचीन हिंदू धर्मशास्त्र कायदे पंडीतात एकवाक्यता नव्हती. शाहू छत्रपती व बाळाजी बाजीराव यांच्या काळात फाशीची शिक्षा नसावी. खून व फितूरीचा दंड म्हणून मालमत्तेवर जप्ती व तुरुंगवास या शिक्षा होत्या. दंड हा उपजिवीकेपेक्षा जास्त असू नये याची काळजी घेतली जाई. एवढेच नव्हे तर दंडाची

रक्कम हप्ता पध्दतीने भरण्याची परवानगी होती. एखादया माणसावर करणी किंवा चेटूक करुन दुसऱ्याला इजा केल्यास साधारणपणे दंड होत असे. करणी व भूतबाधा याचा तपास करण्यासाठी १७७४-७५ मध्ये दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याचे उल्लेख आहेत.

व्याभिचार करणाऱ्या स्त्रीची भावी सदवर्तनाची हमी तिच्या कोणी जवळच्या नातेवाईकाने घेतली तर तिची सुटका होई.

दुसऱ्या बाजीरावाने ब्राम्हणंनी कन्याविक्रय करु नये, ९ वर्षाच्या आत मुलीचे लग्न करावे असे आदेश काढले होते. हा नियम तोडणे गुन्हा समजले जाई. सक्तीने लावलेले लग्न बेकायदेशीर ठरविले जाई.

पेशवेकाळात तुरुंगाची अशी व्यवस्थाच [जागा] नव्हती. किल्ल्यातील काही खोल्यांचा वापर त्यासाठी केला जाई. नाना फडणवीस नगरच्या किल्ल्यात कैदेत असल्याबाबतचा उल्लेख आढळतो. दोन तुरुंगातील कैदयांचा दर्जा लक्षात घेऊन जेवणाच्या थाळीचे स्वरुप ठरत असे. कैदयांच्या आरोग्याचाही विचार केला जाई. कैदयांची प्रकृती बरी नसल्यास त्याची काळजी घेण्यासाठी त्याची बायको किंवा नातेवाईकास तुरुंगात राहण्याची परवानगी होती. कैदयांना आईवडीलांचे श्राध्द, उपवर मुलींची लग्ने, मुलांच्या मुंजी इ. कार्यासाठी घरी जाण्यास परवानगी होती. कैदी तुरुंगात असताना बायको मृत्यु पावली तरी अंत्यविधीसाठी परवानगी दिली जाई. कैदयांना झालेल्या शिक्षेत सूट मागण्याचा कोणताही हक्क नव्हता. त्यांना पूर्णपणे तेथील अधिकाऱ्यांच्याच मर्जीवर अवलंबुन राहावे लागे.